**वाचा:-** १.महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (सेवाप्रवेश ) नियम- 1967.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95 नुसार.
३. सामाजिकन्याय,सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,परिपत्रक क्रमांक सीबीसी10/2004/प्रक्र570/मावक-5, मंत्रालय,मुंबई -32,दिनांक :-05/03/2005 व 12/12/2011.
४.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. एपटी-2014/प्र.क्र-139/आस्था-8 दि.05-07-2014.
५.क्र.सेवाप्र-2013/प्र.क्र.106/आस्था ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग अधिसूचना दि.10 जून 2014
६.शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.अनियो-2015/प्रा.क्र.62/वित्त-5दि.13-06-2017
७.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण1118/प्र.क्र.417/16-अ दि.18-12-2018,
८.सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राआधो-409/प्र.क्र.31/ 16-अ, दि. 12 फेब्रुवारी, 2019
९.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-2018/प्र.क्र.141/16अ दि. 29-05-2019,
१०.महाराष्ट्र शासन इतर मागासवर्ग भटक्या जमाती आणि विशेष,विमुक्त जाती,सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन निर्णय क्र मावक दिनांक/18.क्र.प्र/2020-सीबीसी-.. दि. 31-01-2020,
११.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.141/आस्था-8 दि.08-04-2021,
१२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:प्रानिमं-1222/प्र.क्र.54/का.13-अ दि. 04-05-2022,
१३. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-2022 /प्र.क्र.11/आस्था-8दि.10-05-2022.
१४.महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-पदनि-2022/प्र.क्र.2/2022/आ.पु.क.दि.30-09-2022,
१५.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-2022/प्र.क्र.11/आस्था-8दि. 21-10-2022,
१६.वित्त विभाग शासन निर्णय 2022/प्र.क्र.2/ 2022/ आ.पु.क. दिनांक-31-10-2022,
१७.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-2022/प्र.क्र.11/आस्था-8दि.15-11-2022,
१८.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन शुद्धीपत्रक क्रमांक संकीर्ण-2022/प्र.क्र.11/आस्था8/2022दि.25-11-2022,
१९.मा.विभागीय आयुक्त यांच्या बिंदु नामावली नोंदवही मंजूर जा.क्र.२०२२/मावक/कक्ष-१/सिआर-२५२/कावी दि.२६/१२/२०२२
२०.महाराष्ट्र शासन इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-/2023प्र/76.क्र.मावकदि09.03.2023.. .
२१.जिल्हा परिषद नांदेड मार्फत प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात 01/23 दि.05-08-2023
२२.आय.बी.पी.एस.कंपनी मार्फत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आलेली परीक्षा दि. 02-11-2023 व आय.बी.पी.एस.कंपनी कडुन प्राप्त गुणानुक्रमे यादी दि.१६/०२/२०२४.
२३.माउपसचिव जिल्हा परिषद अस्थापना महाराष्ट्र शासन. यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-2022.क्र.प्रा/11/(भागधारिका)आस्था-८ दि.5.1.2024
२४.जिल्हा निवड समिती,नांदेड यांनी मान्यता प्रदान केलेली अंतिम निवडसुची व सभा अहवाल दि. 05.03.2024

**जाक्र./जिपनां/शिअप्रा/प्रा-१९/२३०३/२०२४**
**शिक्षण विभाग प्राथमिक,**
जिल्हा परिषद, नांदेड
दिनांक : -१३ /०३ /२०२४

**आदेश,**

ज्या अर्थी संदर्भ क्रमांक १ ते २४ वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार सरळसेवा भरती अंतर्गत जिल्हा परिषदे मधील गट क ची रिक्तपदे भरणे संबंधी तरतुदी प्रमाणे शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत **विस्तार अधिकारी (शिक्षण)** या संवर्गातील वेतन संरचना एस-15, 41800-132300 मधील सरळसेवा भरतीने रिक्त पदे भरण्यास जिल्हा निवड समिती,नांदेड नेसंदर्भ क्र. 24 वरील सभाअहवाला प्रमाणे अंतिम निवडसुचीस मान्यता प्रदान केलेली आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून संदर्भ क्रमांक 24 वरील अंतिम निवडसुचीतील खालील परिशिष्टातील उमेदवारांची **विस्तार अधिकारी (शिक्षण)** या पदावर एस-15, 41800-132300 या वेतन श्रेणीत सरळसेवेने नेमणुक करून पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येते.

**परिशिष्ट**

| **अ. क्र** | **उमेदवाराचे नाव व पत्ता** | **निवड प्रवर्ग** | **पदस्थापनेचे ठिकाण** |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | **श्री.संग्राम यादवराव कांबळे, मु.बोधीसत्व, स्वप्नजा गार्डन, झेंडा चौक, वाडी बु. ता.जी.नांदेड** | **अनुसूचित जाती** | **लोहा-२ ता.लोहा जि.नांदेड** |

**नेमणुकीच्या अटी व शर्ती :-**

1. हे आदेश निर्गमित झाल्या पासून 15 दिवसाचे आत नेमणूकीचे ठिकाणी सर्वसंबंधित मुळकागदपत्रासह रूजू व्हावे लागेल अन्यथा आपली नेमणूक रदद समजण्यात येईल.
2. उमेदवारास नेमणूकीच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.
3. नेमणूकीच्या ठिकाणी उपस्थित करून घेताना संबंधीत विभाग प्रमुखांनी परिशिष्ठातील उमेदवाराची शैक्षणिक पात्रता,वय,जातप्रमाणपत्र,जातवैद्यता प्रमाणपत्र तपासूनच उपस्थित करून घ्यावे.
4. उमेदवाराने उपस्थित होताना वर्तणूक चांगली असल्याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

5.या आदेशान्वये देण्यात येत असलेली नियुक्तीही उमेदवाराचे सध्याचे स्वास्थाचे जिल्हा शल्यचिकीत्सक यांचेकडुन प्राप्त वैद्यकीय प्रमाणपत्राचे अधिन राहून करण्यात येतआहे.

6. नेमणूकीच्या ठिकाणी रूजू होताना उमेदवाराने ठरावीक नमुन्यातील शपथपत्र (ओथ ऑफएलिजंस) भरून दयावे लागेल तसेच सेवाप्रवेश नियमातील परिशिष्ट 10 नियम 3 अन्वये नमुना फ मधील करारनामा भरून दयावा लागेल.

7. आंतर जिल्हा बदलीसाठी किमान 5 वर्षसेवेची अट राहील,त्यापुर्वी उमेदवारास आंतर जिल्हा बदलीचा अर्ज सादर करता येणार नाही.

8. उमेदवारास नांदेड जिल्हयातील कोणत्याही तालुक्यात पदस्थापना देण्यात येईल तेथे त्यांना नोकरी करावी लागेल.

9.उमेदवारास शासन निर्णय क्रमांक अंनियो1005/126/सेवा-4/दिनांक:-31/10/2005 अन्वये नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना.ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.13/06/2017 नुसार राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) स्तर-1 लागू राहील.

10.उमेदवारास सदरील पदासाठी विहीत केलेली भाषा परीक्षा (हिंदी व मराठी )आणि सेवाप्रवेशोत्तर परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील.

11.शासन निर्णय दिनांक 20/07/2002 नुसार शासनमान्य संगणक प्रमाणपत्र परीक्षा नियुक्ती दिनांकापासून 2 वर्षाचे आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा आपली सेवा समाप्त होईल.

12.सदर पदास वेळोवेळी विहीत करण्यात येणा-या प्रशिक्षणास उपस्थित राहणे व ते यशस्वीरित्या पूर्ण करणे बंधनकारक राहील.

13.नोकरी सोडावयाची असल्यास 1 महिनाअगोदर रितसर ठरावीक नमुन्यात नोटीस दयावी लागेल अथवा 1 महिन्याचे मुळवेतन जिल्हा परिषदेकडे चालानव्दारे भरावे लागेल.

14.वरील आदेशातील नेमणुक ही हंगामी स्वरुपाची असून कोणतेही कारण न दाखविता किंवा नोटिस न देता कामावरुन कमी करण्यात येईल.

15.उक्तपदासाठी उमेदवाराने सादर केलेले मुळकागदपत्रे भविष्यात चुकीची अथवा गैरमार्गाने मिळवल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीताची नियुक्ती संपुष्टातआणण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती,नांदेड यांना राहतील.

16.तसेच परिशिष्ठातील निवड केलेल्या उमेदवारास शासनाने वेळोवेळी विहीत केलेले शासन निर्णय,परिपत्रके यातील तरतूदी बंधनकारक राहतील.

(मिनल करनवाल-भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नांदेड.**

**प्रतिलीपी:-**

1.मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त, कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविन यसादर
2. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड, यांना माहितीस्तव.
4.उपमुख्यकार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव.
5. मुख्यलेखा व वित्तअधिकारी,जिल्हापरिषद,नांदेड,यांनामाहितीस्तव.
६.गटविकास अधिकारी, पंचायत समिती लोहा ता.लोहा जि.नांदेड, यांना माहितीस्तव.
७. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती लोहा ता.लोहा जि.नांदेड, जि.नांदेड यांना आवश्यक कार्यवाहीस्तव .
८. रोखपाल / तरतुद प्रस्तुत कार्यालय,यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
९. संबंधितास अनुपालनास्तव.

Sd
(मिनल करनवाल-भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नांदेड.**